आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

५ सप्टेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- देशभरात आज शिक्षक दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन/ राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू करणार उत्कृष्ट शिक्षक पुरस्कारांचं वितरण

- भारतीय अर्थव्यवस्थेत सुमारे १६० अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या गुंतवणुकीसह सिंगापूर हा भारताचा प्रमुख आर्थिक भागीदार असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- हरियाणा विधानसभा निवडणुकीची तसंच जम्मूकाश्मीर विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याची अधिसूचना जारी

**आणि**

- चौथी हॉकी इंडिया आंतरविभागीय स्पर्धा आजपासून पुण्यात सुरु होणार

**<><><><><>**

देशभरात आज शिक्षक दिवस साजरा होत असून यानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दरवर्षी ५ सप्टेंबर हा माजी राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस, राष्ट्रीय शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो.

शालेय शिक्षण क्षेत्राचा दर्जा उंचावण्याबरोबर विद्यार्थ्यांचं आयुष्य समृद्ध करण्यासाठी योगदान देणाऱ्या ८२ शिक्षकांना आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार दिले जाणार आहेत. राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळालेल्यांमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातले कलाशिक्षक सागर बगाडे आणि गडचिरोली जिल्ह्यातले

मंतैय्या बेडके यांचा समावेश आहे. या पुरस्काराचं स्वरूप ५० हजार रुपये रोख, रौप्य पदक आणि प्रशस्तीपत्र असं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शिक्षकदिनानिमित्त सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या आहेत. कोवळ्या मनाला घडवणाऱ्या सर्व शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस, असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येत आहेत. यंदा या पुरस्कारांसाठी प्राथमिक, माध्यमिक आणि इतर विभागांमधून १०९ शिक्षकांची निवड करण्यात आली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र शासनानं महिला आर्थिक सक्षमीकरणासाठी दमदार पावलं उचलून महिला सक्षमीकरणाचा नवा आदर्श देशापुढे ठेवला आहे, अशा शब्दात राष्ट्रपतींनी राज्यातल्या महिला विकासाच्या योजनांचं कौतुक केलं. महाराष्ट्राच्या लातूर जिल्ह्यात उद्गीर इथं महिला सक्षमीकरण मेळाव्यात त्या काल बोलत होत्या. महिलांनी आपल्या आरोग्यावर लक्ष केंद्रीत करावं, आपल्या आणि कुटुंबाच्या भविष्यासाठी स्वत:कडे देखील लक्ष द्यावं असं आवाहन राष्ट्रपतींनी यावेळी केलं.

**बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू**

***‘‘प्रायः मातायें और बहनें परिवार के स्वास्थ का ध्यान तो देती है, लेकिन अपने भोजन और स्वास्थ का ध्यान नही रखती है। मै सभी बहनों से कहना चाहती हूं, की आप लोग अपने स्वास्थ पर भी ध्यान दें। बच्चों और परिवार की देखभाल करने मे अपने स्वास्थ को अनदेखा नही करना है। आपको आपने और आपके परिवार के***

***भविष्य के लिये भी अपने स्वास्थ का ध्यान रखना होगा।''***

या कार्यक्रमाला राज्यपाल सी पी राधाकृष्णन, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लातूरचे पालकमंत्री गिरीष महाजन, मंत्री संजय बनसोडे, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे उपस्थित होते.

या कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, तसंच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या लाभार्थ्यांना निधीवाटप करण्यात आलं.

**<><><><><>**

भारतीय अर्थव्यवस्थेत सुमारे १६० अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या गुंतवणुकीसह सिंगापूर हा भारताचा प्रमुख आर्थिक भागीदार असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ब्रुनेईचा यशस्वी दौरा आटोपल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी काल सिंगापूर इथं पोहोचले. त्यानंतर मोदी आणि सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वोंग यांच्यात आज शिष्टमंडळ स्तरावरील चर्चेनंतर भारत आणि सिंगापूर दरम्यान आरोग्य आणि औषध, शिक्षण आणि कौशल्य विकास, डिजिटल तंत्रज्ञान आणि भारत-सिंगापूर सेमीकंडक्टर परिसंस्था भागीदारी या क्षेत्रातील सहकार्यासाठी चार सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. त्यानंतर मोदी बोलत होते. सिंगापूर हा केवळ भागीदार देशच नाही तर प्रत्येक विकसनशील राष्ट्रासाठी प्रेरणास्थान आहे, असं मोदी यांनी सांगितलं. त्यानंतर दोन्ही प्रधानमंत्र्यांनी सेमीकंडक्टर आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील अग्रगण्य सिंगापूर कंपनी AEM होल्डिंग्स लिमिटेडलाही भेट दिली. प्रधानमंत्री मोदी आज सिंगापूरचे राष्ट्रपती थर्मन

षणमुगरत्नम आणि इतर अनेक मान्यवरांचीही भेट घेणार आहेत. ते सिंगापूरच्या कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही भेटणार आहेत.

**<><><><><>**

गेल्या दहा वर्षांत भारताची सौर उर्जा क्षमता ३२ पटींनी वाढली असून हा वेग कायम राहिला तर २०३०पर्यंत देश ५०० गिगा वॅट इतकी सौर उर्जा निर्मिती करेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. नवी दिल्ली इथे आयोजित दोन दिवसांच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय सौर महोत्सवाला प्रधानमंत्री मोदी यांनी व्हिडीओ संदेशाद्वारे संबोधित केलं. भारताने गेल्या काही वर्षांत हरित ऊर्जा निर्मितीत मोठी प्रगती केली आहे. भारतासह जगभरातही अनेक संस्कृतींनी सूर्याचं महत्त्व सांगितलं आहे. या महोत्सवाद्वारे सूर्याचा उत्सव साजरा करण्यात येत आहे, असंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं आज जम्मू काश्मीरच्या तिसऱ्या आणि अंतिम टप्प्यातल्या निवडणुकीसाठी तसंच हरयाणा विधानसभा निवडणुकीसाठी अधिसूचना जारी केली.

जम्मू काश्मीरचा तिसरा टप्पा आणि हरयाणा विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची अंतिम तारीख १२ सप्टेंबर असून १६ तारखेपर्यंत उमेदवार आपला अर्ज मागे घेऊन शकतील. तर जम्मू काश्मीरच्या दुसऱ्या टप्प्यातल्या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. जम्मू काश्मीर मध्ये १८ सप्टेंबर, २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर अशा तीन टप्प्यात मतदान होणार आहे. दरम्यान निवडणूक आयोगानं लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या

कलम १२६ ए अंतर्गत जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकांदरम्यान कोणत्याही प्रकारचे एक्झिट पोल प्रसारित करण्यावर बंदी घातली आहे.

हरयाणा विधानसभेच्या ९० जागांसाठी ५ ऑक्टोबरला एकाच टप्प्यात मतदान होईल.हरयाणामध्ये आजपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु होईल.   दोन्ही निवडणुकांची मतमोजणी ८ऑक्टोबरला होणार आहे.

<><><><><>

केंद्र सरकार, त्रिपुरा सरकार आणि नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरा, आणि ऑल त्रिपुरा टायगर फोर्स यांच्या प्रतिनिधींमध्ये सामंजस्य करारावर काल नवी दिल्ली इथं स्वाक्षरी करण्यात आली. यावेळी गृहमंत्री अमित शहा, त्रिपुराचे मुख्यमंत्री माणिक साहा, गृह मंत्रालय आणि त्रिपुरा सरकारचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नॅशनल फ्रंट आणि त्रिपुरा फ्रंट या संघटनांनी आपली शस्त्र टाकून मुख्य प्रवाहात येणं आणि त्रिपुराच्या विकासासाठी वचनबध्दता दर्शवणं ही अतिशय आनंदाची बाब असल्याचं अमित शहा यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

<><><><><>

कर्मचारी निवृत्तीवेतन योजनेतील वेतन १ जानेवारी २०२५ पासून निवृत्तीवेतनधारकांना देशभरातील कोणत्याही बँकेतून मिळू शकणार आहे. अशी माहिती केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविय  यांनी काल दिली. याचा लाभ कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या ७८ लाखांहून अधिक पेन्शनधारकांना होणार आहे. केंद्रीकृत पेन्शन पेमेंट यंत्रणेला मंजूरी मिळणं ही ईपीएफओच्या आधुनिकीकरणातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. असं मांडवीय यावेळी म्हणाले.

<><><><><>

भारत-सौदी अरेबियाच्या संरक्षण सहकार्याबाबत संयुक्त समितीची सहावी बैठक काल रियाध इथं झाली. भारतीय सशस्त्र दलाचे संयुक्त सचिव, अमिताभ प्रसाद आणि सौदी अरेबियाचे सामरिक बाबींचे संरक्षण उपमंत्री, मेजर जनरल सलमान बिन अवध अल-हरबी यांच्यात उच्चस्तरीय चर्चा झाली. या चर्चेदरम्यान, दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांनी सध्या सुरू असलेल्या संरक्षण कार्यांचा व्यापक आढावा घेतला. या चर्चेमध्ये संयुक्त सराव, तज्ज्ञांची देवाणघेवाण, प्रशिक्षण कार्यक्रम आणि उद्योग सहकार्य यासह लष्करी सहकार्य, आदी विषयांचाही पैलूंचा समावेश करण्यात आला होता.

**<><><><><>**

वरीष्ठ पुरुष गटासाठीची चौथी हॉकी इंडिया आंतरविभागीय स्पर्धा आजपासून महाराष्ट्रात पुणे इथं सुरू होत आहे. या स्पर्धेत देशभरातले १८ संघ सहभागी होणार आहेत. टोक्यो ऑलिम्पिक खेळलेले सुरेंदर कुमार, आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता आकाशदीप तसंच ऑलिम्पियन धरमवीर आणि दिलप्रीत सिंग यांच्यासह अनेक नामवंत खेळाडू यात सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

पॅरीस इथं सुरू असलेल्या पॅरालिम्पिक्स स्पर्धेत काल भारतीय क्रिडापटूंनी चमकदार कामगिरी करत चार पदकं पटकावली. यामध्ये दोन सुवर्णपदकांचा समावेश आहे. हरविंदर सिंगनं तिरंदाजीत ऐतिहासिक कामगिरी करत भारताला पहिलं सुवर्णपदक मिळवून दिलं. काल रात्री झालेल्या स्पर्धेत पुरुष केरी रिकर्व प्रकारांत हरविंदर ही कामगिरी केली. धरमबीरनं पुरुषांच्या क्लब थ्रो F-५१ अंतिम सामन्यात ३४ पूर्णांक ९२ मीटर चा थ्रो नोंदवून आशियाई विक्रम मोडीत काढला

आणि सुवर्णपदक पटकावलं. याच स्पर्धेत प्रणव सूरमाने ३४ पूर्णांक ५९ मीटर थ्रो करत रौप्य पदक जिंकलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरू झालेल्या आरोग्याची वारी पंढरीच्या दारी या शिबिराचा लाभ यंदा आषाढी वारी करणाऱ्या १५ लाखांपेक्षा अधिक वारकऱ्यांनी घेतला. त्यामुळे या आरोग्य शिबिराची नोंद इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्‌समधे झाली आहे. या शिबिराची संकल्पना राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांची आहे. आषाढी वारीच्या पालखी मार्गांवर तसंच पंढरपूर इथे या शिबिराचं आयोजन केलं गेलं. या शिबिरात साडे सात हजार आरोग्य कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता.

**<><><><><>**

आंध्रप्रदेशातल्या पूरग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी आज केंद्रीय गृहविभागाचे अतिरिक्त सचिव संजीव कुमार जिंदाल यांच्या नेतृत्वाखालचं पथक जात आहे. अतिवृष्टीमुळं झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यापूर्वी या पथकानं ताडपल्ली इथं आपत्कालीन व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

**//<><><><><>//**